# जिल्हा परिषद कोल्हापूर



# महिलांसाठी विविध योजना

१) मागासवर्गीयांना व मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरवणे

२) राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम

३) जननी सुरक्षा योजना

४) मोबाईल मेडीकल युनिट

५) प्राथमिक आरोग्य केंद्र २४ x ७

६) नियमित लसीकरण कार्यक्रम

७) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम

८) सुधारित सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना

९) १ किंवा २ मुलींवर शस्त्रक्रिया केलेल्या लाभार्थींना अनुदान देणे.

१०) लेक वाचवा अभियान अंतर्गत लक्ष्मी आली घरी योजना

११) शासकीय / निमशासकीय कार्यालयात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाचा प्रतिबंध

१२) स्तनापान व शिशुपोषण कार्यक्रम अंतर्गत हिरकणी कक्षाची स्थापना

१३) एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या सेवा

**समाज कल्याण जिल्हा परिषद**
**स्व:निधीमधील योजना**

## १) मागासवर्गीयाना व मागासवर्गीय महिलाना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरवणे

**उद्देश -** मागासवर्गीय महीलांनी स्वयंरोजगार करुन स्वावलंबी बनावे.व त्याचे जीवनमान उंचवावे यासाठी साधने व उपकरणे पुरविणे

**अटी व शर्ती -**

- लाभार्थी मागासवर्गीय असणे आवश्यक आहे.
- दारिद्रय रेषेखाली असलेचा दाखला अथवा उत्पन्न दाखला रु. ३६,०००/- चे आतील आवश्यक आहे.
- लाभार्थीचा रहीवाशी दाखला .
- योजनेस पात्र व शिफारस असलेबाबत ग्रामसभ ठराव

सदर योजने अंतर्गत पिको फॉल मशिन घरघंटी, झेरॉक्स मशिन इ. साधने घेवून विनामुल्य साधने पुरवली जातात.

# २) राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम (शासकिय योजना)

- ❖ वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्या नियंत्रण ठेवणेकरिता राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम आपल्या देशात १९५२ पासून राबविणेत येत आहे.या कार्यक्रम अंतर्गत दोन मुलांमध्ये अंतर ठेवणे करिता पाळणा लांबविण्याच्या तात्पुरत्या पध्दती उदा-तांबी,गर्भनिरोधक गोळया,निरोध,तांतडीच्या गोळया, (इमर्जन्सी पिल्स) इ साधने उपलब्ध असून पाळणा थांबविणेसाठी टाका व बिनटाका या स्त्रीशस्त्रक्रिया व बिनटाका व पारंपारिक पध्दतीच्या पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत.
- ❖ जिल्हयात नसबंदी शस्त्रक्रियागृह असलेलया प्रा आ केंद्राच्या ठिकाणी दरमहा टाका नसबंदी शस्त्रक्रिया शिबिरांचे व निश्चित केलेल्या प्रा आ केंद्रे तसेच ग्रामीण रुग्णालयाचे ठिकाणी बिनटाका नसबंदी शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करुन आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत योग्य लाभार्थीना प्रवृत्त केले जाते व त्यांच्या शस्त्रक्रिया केल्या जातात.शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांना प्रोत्साहनपर मोबदला दिला जातो.
- ❖ कमी वयात लग्न,मुलगाच हवा हा अटटाहास,दोन मुलांमधील कमी अंतर, इ.बाबींवर खास आरोग्य शिक्षणाद्वारे जनजागृती केली जाते.

### ❖ कुटूंब कल्याण कार्यक्रम

कुटूंब कल्याण कार्यक्रम आपल्या जिल्हयात परिणामकारकरीत्या राबविला जाण्यासाठी जिल्हा सोसायटीकडून जिल्हयातील कार्यरत असलेल्या प्रा.आ.केंद्रे, ग्रामीण रुग्णालय, जि.प.दवाखाने व तालुका दवाखाने या आरोग्य संस्थांना त्यांच्या उदिदष्टाच्या प्रमाणात तसलमात दिलेली आहे.

**शासकीय आरोग्य संस्थेसाठी** पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केल्यास सर्व लाभार्थ्यासाठी एकूण रु.१४५१/- लाभ देणेत येतो. स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया फक्त दारिद्रय रेषेखालील व अनु. जाती व जमातीमधील लाभार्थी साठी रु.६००/- रुपये व दारिद्रय रेषेवरील लाभार्थीसाठी रु. २५०/- लाभ दिला जातो.

कुटूंब कल्याण कार्यक्रम सन २०११-१२ मधील माहे जानेवारी २०१२ अखेर साध्य केलेले काम खालील प्रमाणे आहे.

| सन | उददीष्ट | साध्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०११-१२<br>(जानेवारी २०१२ अखेर) | १८५०० | १४८६३ | ८०.३४ |

## ३) जननी सुरक्षा योजना

जननी सुरक्षा योजना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत कोल्हापूर जिल्हयामध्ये १ एप्रिल २००५ पासून सुरु आहे.

- **उददीष्ट –**

  जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागातील मुख्यतः चाळी, झोपडपटट्ी व गलीच्छ वस्ती इ. दारिद्रय रेषेखालील व अनु.जाती व अनु.जमातीच्या महिलांचे आरोग्य संस्थांमध्ये होणा-या प्रसुतीचे प्रमाण वाढविणे व माता मृत्यु, अर्भक मृत्युचे प्रमाण कमी करणे.

- **लाभार्थी पात्रता**
  - सदर योजनेचा लाभ अनु.जाती/जमाती व दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना देय आहे.
  - लाभार्थी महिलेचे वय प्रसुती पुर्व नोंदणी करताना कमीत कमी १९ वर्ष असावे.
  - सदर योजनेचा लाभ दोन अपत्यापर्यंत देय राहील.

- **योजनेअंतर्गत मिळणारे लाभ**

जननी सुरक्षा योजने अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील व अनुसूचीत जाती जमाती मधील ग्रामीण भागातील गरोदर मातांना घरी प्रसुती झाल्यास रु.५००/- व आरोग्य संस्थेत प्रसुती झाल्यास रु.७००/- इतका लाभ देण्यात येतो. शहरी भागातील लाभार्थ्यास प्रसुती झाल्यानंतर रु.६००/- चा लाभ देणेत येतो. या योजनेमध्ये मान्यता प्राप्त खाजगी रुग्णालयात सिझर शस्त्रक्रिया झाल्यास रु.१५००/- चे अनुदान मान्यताप्राप्त खाजगी हॉस्पीटलला देय आहेत.

जननी सुरक्षा योजने बाबत अधिक माहितीसाठी जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडील वैद्यकिय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

| अ.क्र. | सन | उददीष्ट | साध्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २ | २०११-१२ (जानेवारी २०१२ अखेर) | ८३३६ | ६६४६ | ७९.७३ |



## ४) मोबाईल मेडिकल युनिट

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत राज्यातील आरोग्य सेवांपासून वंचित आणि अर्ध वंचित (Unserved & Underserved) क्षेत्रामध्ये वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत सन २०११-१२ मध्ये मोबाईल मेडिकल युनिट प्रकल्प राबविण्यात येत आहे.

कोल्हापूर जिल्हयामधून मोबाईल मेडिकल युनिट प्रकल्पाकरीता डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पीटल, कदमवाडी, कोल्हापूर यांची निवड करणेत आलेली आहे.

जे ठिकाण अति दुर्गम आहे व त्याठिकाणी वैद्यकिय सेवा पुरविल्या जात नाहीत अथवा पोहचत नाहीत त्या ठिकाणी मोबाईल मेडिकल युनिट प्रकल्प राबविणेकरीता जिल्हयातून १) पन्हाळा, २) शाहुवाडी व ३) गगनबाबडा या तीन तालुक्यांची निवड करणेत आलेली आहे. वरील तीन तालुक्यांमधून अति दुर्गम अशा ४१ गावंची निवड आरोग्य सेवा पुरविणे करीता करणेत आलेली आहे.



## ५) २४ x ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे

अर्भक मृत्यू, मातामृत्यू व एकुण जननदर कमी करणे हे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी बरेच उपक्रम उपकेंद्रे व प्रा.आ.केंद्रे स्तरावरुन राबविण्यात येत आहेत. याचा एक भाग म्हणुन २४ x ७ प्रा.आ.केंद्र ही एक महत्वाची योजना आहे. यामध्ये आठवडयातील सातही दिवस व चोवीस तास बाळंतपण व नवजात अर्भक दक्षता इ. सेवा देणे येते. एकुण ७३ पैकी ४० प्रा.आ.केंद्रे व ४१३ पैकी १२५ उपकेंद्रांची **२४ x ७ योजने अंतर्गत** निवड करणेत आलेली आहे.

## ६) नियमित लसीकरण कार्यक्रम

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत नियमित लसीकरण व बळकटीकरण कार्यक्रमांतर्गत गाव पातळीवर निश्चित दिवशी ग्राम आरोग्य पोषण दिवस आयोजित करण्यात येतात. यानुसार जिल्हयामध्ये प्रा.आ.केंद्र निहाय कार्यक्षेत्रातील गाव, वाडी, वस्ती, वॉर्डवार, लसीकरणाकरीता ग्राम आरोग्य पोषण दिवस कृती कार्यक्रम तयार करुन त्यानुसार लसीकरण ग्राम आरोग्य पोषण दिवस आयोजित करणेत येतात.

लसीकरणासाठी लागणारी लस, लसीकरण कार्डे, ए.डी. सिरींज, व्हॅक्सीन कॅरीअर व इतर आवश्यक सामुग्री शासना मार्फत पुरविण्यात येते. यानुसार खालील प्रमाणे लसीकरण केले जाते.

१) गरोदरपणी इंजेक्शन धनुर्वातचे २ मात्रा दिली जाते. जेणेकरुन मातेचे धनुर्वातापासून संरक्षण व्हावे.

२) बालमृत्यु टाळण्यासाठी – जन्मल्यापासून मुलाला ५ वर्षापर्यंत बी.सी.जी., त्रीगुणी, पोलिओ, गोवर व जीवनस्त अ तसेच दुहेरी लस अशाप्रकारच्या लसी देवून मुलाचे ६ आजारापासून संरक्षण केले जाते.

३) जिल्हा स्तरावर वेळोवेळी लसीकरणा बददल विविध प्रकारचे प्रशिक्षण स्त्री /पुरुष आरोग्य सेवक / सहाय्यक यांना लसीच्या आधुनिक तंत्रज्ञान बाबत प्रशिक्षण दिले जाते.

### ग्राम आरोग्य पोषण व समुपदेशन दिवस

- 

## ७) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम

मातामृत्यु व बालमृत्यु दर कमी करण्यासाठी माता व बालकांना वेळीच उपचार मिळणे ही बाब महत्वाची आहे. यास अनुसरुनच जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविणेत येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

१) गरोदर माता नोंदणी, तपासणी, औषधोपचार, बाळंतपणे या सर्व सेवा मोफत पुरविणे. यामध्ये प्रयोगशाळा तपासण्या, सिझेरियन सेक्शन, रक्त संक्रमण या बाबींचाही समावेश आहे.

२) नवजात अर्भकांना ०-३० दिवसांपर्यंत उपचारासाठी दाखल झाल्यास नोंदणी, तपासणी व औषधोपचार या सेवा मोफत पुरविणे.

३) गरोदर मातांना बाळंतपणाच्या वेळी व अर्भकांना (०-३० दिवस) घरातून रुग्णालय, रुग्णालय ते रुग्णालय (संदर्भ सेवेसाठी) आणि रुग्णालय ते घर अशी वाहतूक सेवा मोफत पुरविणे.

४) गरोदर माता व अर्भक रुग्णालयात असेल त्या कालावधीसाठी आहारसेवा मोफत पुरविणे.

- **कोल्हापूर जिल्हयामध्ये जननी शिशू सुरक्षा योजना अमंलबजावणी सुरु झाली असुन तपशिल खालील प्रमाणे आहे.**
  - जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत जिल्हा शल्यचिकीत्सक, सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापूर या ठिकाणी संदर्भ सेवा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी संपर्क न.(**०२३१-२६४३४३४**) व टोल **फ्रि नंबर १०२** हा आहे.
  - नियंत्रण कक्षामध्ये २ संगणक खरेदी करण्यात आले असनु इंटरनेट सुविधा सुरु करणेत आली आहे. तसचे इतर आवश्यक साधन सामुग्री खरेदी करुन नियंत्रण कक्ष अद्यावत करणेत आलेला आहे. नियंत्रण कक्षाच्या दर्शनी भागामध्ये "संदर्भ सेवा नियंत्रण कक्ष" असा बोर्ड लावणेत आलेला आहे.
  - सदर कार्यक्रमांतर्गत एकुण ३ कॉल असिस्टंट पदांची नियुक्ती करणेत आली आहे.
  - सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा आर.सी.एच. अधिकारी यांना जिल्हा नोडल ऑफिसर म्हणून नियुक्त केले बाबत सुचना पत्र देणेत आले आहे तसेच

प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग जि.प.कोल्हापूर यांना तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती केले बाबत पत्रा व्दारे सुचित करणेत आले आहे.

- वैद्यकिय अधिक्षक उप.जि.रु/ग्रा.रु.यांना मा.जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्या मार्फत शासन निर्णय व मागदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.
- जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मिळाणा-या उपलब्ध सुविधांचे फलक आरोग्य संस्थामध्ये व सर्व रुग्णावाहिकांवर दुरध्वनी संपर्क नं.ठळक अक्षरात लावण्यास सुचित करणेत आले आहे.
- रेफरल ट्रान्सपोर्ट व वाहन चालकांसाठी भ्रमण ध्वनीकरीता जिल्हा स्तरावरुन आर.सी.एच.अंतर्गत अनुदान वितरीत करणेत आलेले आहे.
- उप.जि.रु/ग्रा.रु./प्रा.आ.केंद्रातील रुग्णवाहिका चालकांचे भ्रमण ध्वनी क्रमांक उपलब्ध करुन घेणेत आले आहेत. तसेच भ्रमण ध्वनी बंद न करणेबाबत व रुग्ण वाहिका अद्यावत करुन घेणेच्या सुचना देणेत आलेल्या आहेत.



# चिंता नको खर्चाची, मोफत सेवा बाळंतपणाची.

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
## जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रम,
## कोल्हापूर



हा कार्यक्रम उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालये, प्रा. आ. केंद्र व उपकेंद्र स्तरावर राबविण्यात येत आहे.

### गरोदर स्त्रीसाठी सेवा...

- सरकारी दवाखान्यात गरोदरपणी, बाळंतपणात व प्रसूतीपश्चात ४२ दिवसापर्यंत सर्व स्त्रियांना मोफत सेवा देण्यात येते.
- मोफत औषधे व उपचार दिले जातात.
- एवढेच नव्हे तर घरापासून प्राथमिक आरोग्य केंद्र/ शासकीय रुग्णालयापर्यंत आणि परतीसाठी वाहनाची मोफत व्यवस्था करण्यात येते.
- रक्त, लघवी व सोनोग्राफीसारख्या तपासण्या त्याचप्रमाणे रक्तपुरवठा (आरोग्यसंस्थेच्या दर्जानुसार जेथे उपलब्ध असतील तेथे) मोफत करण्यात येतात.
- सामान्य बाळंतपण झाल्यास ३ दिवसांपर्यंत तर शस्त्रक्रियेद्वारे बाळंतपण झाल्यास ७ दिवसापर्यंत मातेला मोफत औषध व आहार देखील दिला जातो.

### ३० दिवसापर्यंतच्या नवजात आजारी बालकासाठी मोफत सेवा...

- जन्मल्यानंतर ३० दिवसापर्यंत सर्व अर्भकांना आजारपणात मोफत औषधोपचार केले जातात.
- आजारी बाळासाठी घरापासून शासकिय दवाखान्यापर्यंत आणि परत घरी जाण्यासाठी वाहन व्यवस्था मोफत उपलब्ध आहे.
- बाळासाठी आवश्यक त्या तपासण्या व रक्तपुरवठा (आरोग्यसंस्थेच्या दर्जानुसार जेथे उपलब्ध असतील तेथे) मोफत करण्यात येतात.

**अधिक माहितीसाठी नजिकच्या सरकारी दवाखान्याशी संपर्क साधा.**

संदर्भ सेवा नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी संपर्क क्रमांक (०२३१-२६४३४३४) व टोल फ्री नंबर १०२

# ८) सुधारित सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना (शासकिय योजना)

सुधारित सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना अंतर्गत दिनांक १ एप्रिल २००७ पासून सदर योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील नोंद असलेल्या लाभार्थीना लाभ देय आहे.

**<u>योजनेचे स्वरुपः-</u>**

- कुटुंब नियोजन नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या जोडप्यांना एक मुलीवर नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेतलेस रोख रु.२०००/- व पोष्टाच्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपांत रु.८०००/- तसेच दोन मुलींवर नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेतल्यास रोख रु.२०००/- व प्रत्येक मुलींस पोष्टाच्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपांत रु. ४०००/- देणेत येतात.

**<u>योजनेच्या अटी व शर्तीः-</u>**

१) सदर योजनेचालाभ फक्त महाराष्ट्र राज्यात अदिवासी कुटुंबानाच देय आहे.

२) लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील असणे आवश्यक आहे.

३) पती किंवा पत्नीने केलेली कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया राज्यातील शासनमान्य अथवा नोंदणीकृत वैद्यकिय रुग्णालयांत केलेली असावी.

४) पती अथवा पत्नीपैकी कोणीही यापूर्वी निर्बिजीकरण शस्त्रक्रिया केलेली नसावी.

५) सदर योजनेच्या लाभार्थीना फक्त एक किंवा दोन मुलीच असणे आवश्यक आहे.मुलगा मात्र नसावा.

६) पहिल्या मुलीच्या जन्माच्या वेळी आईचे वय १९ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

७) नसबंदी शस्त्रक्रिया झालेनंतर या योजनेचा लाभ मिळणेसाठीचा परिपूर्ण प्रस्ताव शस्त्रक्रियेच्या तारखेपासून ३ वर्षाचे आंत जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयांत सादर करणे आवश्यक आहे.

## सावित्री बाई कन्या कल्याण योजनेअंतर्गत खालील प्रमाणे लाभ देणेत आलेले आहेत.

| अ.क्र. | वर्ष | लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या | | | प्राप्त अनुदान रु. लाखांत | खर्च रु. लाखांत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एक मुलगी | दोन मुलगी | एकूण | | | |
| १ | २००५-०६ | ५ | १९ | २४ | ४.०० | २.४० | |
| २ | २००६-०७ | ३ | ७ | १० | १.४० | १.०० | |
| ३ | २००७-०८ | ९ | ४१ | ५० | ६.६० | ५.०० | |
| ४ | २००८.०९ | ६ | २४ | ३० | ३.०० | ३.०० | |
| ५ | २००९.१० | ४ | १५ | १९ | १.९० | १.९० | |
| ६ | २०१०.११ | १ | १० | ११ | १.१० | १.१० | |
| ७ | २०११.१२ जनेवारी २०१२ अखेर | १५ | ६२ | ७७ | ७.७० | ४.२० | ३५ लाभार्थींना अनुदान वाटप करणेसाठी मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे बिल सादर करणेत आलेले आहे. |

# ९) नियम व अटी (सन २०११-१२ साठी)

## जि.प. स्वनिधी योजना

योजनेचे नांव :- **१ किंवा २ मुलीवर शस्त्रक्रिया केलेल्या लाभार्थीना अनुदान देणे**

१) तरतूद :- जि.प. **स्वनिधी** तरतूद २०११-१२

२) भौतिक उदिष्ट :- १ मुलगी व २ मुली कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणारे लाभार्थी

३) उददेश :- सामाजिक दर्जा उंचाविण्याच्या दष्टीने केवळ एक अथवा दोन मुलींनंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया घेणा-या जोडप्यांना प्रोत्साहन मिळावें हा हेतू लक्षात घेवून सदरची योजना जि.प. **स्वनिधीतून** राबविणेत येत आहे.

४) स्वरुप :- सदर योजनाअतंर्गत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणा-या जोडप्यांना १ मुलगी असल्यास त्या मुलीस रक्कम रुपये ५०००/- आणि २ मुली असल्यास प्रत्येक मुलीस रक्क्म रुपये १०००/- या प्रमाणे एकूण रक्क्म रुपये २०००/- ची **अल्पबचत प्रमाणपत्र देणेण या योजनेकरिता जि.प.स्वनिधींतून** प्रोत्साहन रक्क्म पोस्ट ऑफीस, यांच्याकडे **तालुका स्तरावरुन अल्पबचत प्रमाणपत्रा**मध्ये गुंतविण्यात येईल.

५) नियम अटी

१) सदर योजनेच्या लाभार्थीना फक्त एक अथवा दोन मुली असाव्यात परंतु मुलगा मात्र नसावा.

२) पहिल्या मुलीच्या जन्माच्या वेळी मुलीच्या आईचे वय कमीत कमी १९ वर्ष पूर्ण असावे. पोस्ट ऑफीस यांच्याकडे **अल्पबचत प्रमाणपत्रा** मध्ये गुंतविण्यात येईल.

३) जोडप्यानी केलेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया राज्यातील शासन मान्य नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिक रुग्णालयात दिनांक १ एप्रिल २०११ रोजी अथवा तदनंतर ३१ मार्च १२ अखेर केलेली असावी.

४) **तालुका आरोग्य अधिकारीपंचायतसमिती** यांनी लाभार्थीचा प्रस्ताव नियम अटीनुसार तपासून या कार्यालयाकडे फक्त पात्र लाभार्थीची चेक लिस्ट पाठवावी. व प्रोत्साहन रक्क्म पोस्ट ऑफीस यांच्याकड **अल्पबचत प्रमाणपत्रा** मध्ये गुंतविण्यात येईल.

५) लाभार्थी निवड करणेचा अधिकार **आरोग्य** समिती **जिल्हा परिषदकोल्हापूर** यांचा राहिल.

| अ. क्र. | वर्ष | लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या | | | मंजूर अनुदान रु. लाखात | खर्च रु. लाखात | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ मुलगी | २ मुलगी | एकुण | | | |
| १ | २००८-०९ | २० | ० | २० | १.०० | १.०० | |
| २ | २००९-१० | १४ | ० | १४ | १.०० | ०.७० | |
| ३ | २०१०-११ | २६ | ५८ | ८४ | २.५० | २.४८ | |
| ४ | २०११-१२ माहे जानेवारी १२ अखेर | ४ | १९ | २३ | २.५० | ०.५८ | |

# नाविन्यपूर्ण योजना

# १०) लेक वाचवा अभियान अंतर्गत लक्ष्मी आली घरी

कोल्हापूर जिल्यामध्ये ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांचे प्रमाण १९९१ च्या जनगनने नुसार १००० बालकांच्या मागे ९३१ असणारे प्रमाण हे २००१ च्या जनगनने नुसार ८३९ असे प्रमाण झालेले आहे यामध्ये अधिक सुधारणा होण्यासाठी दि.०२ ऑक्टोंबर २००७ पासुन लेक वाचवा अभियान अंतर्गत विविध आरोग्य विषयक कार्यक्रम व योजना सर्वांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे त्यामुळे प्रामुख्याने तालुकास्तरावर कार्यशाळा, रॅली, निबंध व वकृत्व स्पर्धा, आरोग्य प्रदर्शने, चित्ररथ, सरपंच मेळावा, लोककला व पथनाटय कार्यक्रम, होर्डीग्स, हस्तपत्रीका, पीव्हीसी बॅनर त्याच प्रमाणे आशा व अंगणवाडी सेविका यांचे मार्फत ए.एन.सी ट्रेकिंग करण्यात येत आहे त्यामुळे कोल्हापूर जिल्हयाच्या २०११ च्या जनगनने नुसार हे प्रमाण ८४५ इतके झालेले आहे.

या योजने अंतर्गत दि. २ ऑक्टोंबर २०१० नंतर जन्मास येणा-या प्रत्येक मुलींला व तिच्या आई वडिलांना खालील प्रमाणे लाभ देण्यात येतो.

- सदर मुलींच्या आई वडीलांचा सत्कार करुन आईस साडी चोळी व ओंटी देण्यात येते.
- बालकांसाठी थर्मल किट - उबदार ब्लॅन्केट, कपडे व गोदडी देऊन बालकांचे योग्य तापमान राखण्यास मदत करण्यात येते.
- बाळांसाठी बेबी किट - यामध्ये बेबी पावडर, साबण, तेल, बाबा सुट याचा समावेश करण्यात आलेला आहे.



# लेक वाचवा अभियान अंतर्गत केलेली कार्यवाही

- **कोल्हापूर जिल्हयाचे सन २००१ च्या जनगणनेनुसार बालिकांचे प्रमाण हे दरहजारी ८३९ इतके होते परंतु २०११ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्हयाचे प्रमाण ८४५ इतके झाले आहे.**

- **लिंग प्रमाणात निरंतर सुधारणा करणेसाठी सर्वांच्या सहकार्याने दि.०२ ऑक्टोंबर २००७ पासुन लेक वाचवा अभियानाची सुरुवात करण्यात आली.**

❖ दि. १५ ऑगस्ट २००९ रोजी **एस.आय.ओ.बी.** चा शुभारंभ

❖ सन २०१० ॲड.वर्षा देशपांडे यांच्या **लेक वाचवा दिंडींचे** आयोजन

❖ दि.१ ऑक्टोंबर २०१० पासुन **लक्ष्मी आली घरी** योजनेअंतर्गत २९४६ लाभार्थ्यांना लाभ

❖ जुलै २००८ मध्ये डॉ.सुधा कंकरीया यांची कार्यशाळा.

❖ सन २०१० मध्ये १३८ **पथनाटय कार्यक्रम**

❖ दि. २ ऑक्टोंबर २००७ रोजी लेक वाचवा अभियान शुभारंभ.

❖ दि. २ ऑक्टोंबर २००७ रोजी खाजगी सोनोग्राफी तंत्रज्ञांची कार्यशाळा.

❖ दि. २६ जानेवारी २००९ रोजी भव्य चित्र व रॅलीचे आयोजन.

❖ आशा स्वयंसेविका यांना गरोदर माता नोंदणी व पाठपुरावासाठी प्रत्येकी रु.२५ मानधन (नाविन्यपूर्ण योजना सन २००९-१०)

❖ दि. २६ जानेवारी २०१० मध्ये लिंग परिक्षण विरोधी **२ डी मॉडेल** वितरण

❖ जानेवारी २०११ मध्ये मुख्यालय व सर्व प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र ठिकाणी लिंग प्रमाण दर्शवणारे **स्कोअर बोर्ड** लावणेत आलेले आहेत.

❖ जानेवारी २०११ मध्ये सर्व उपकेंद्राच्या ठिकाणी अंगणवाडी व आशा कार्यकर्तीसाठी **कार्यशाळा** घेण्यात आल्या आहेत.

## नियोजनबध्द प्रभावी अंमलबजावणीमुळे मिळालेले यश

| सन | लिंग प्रमाण (० ते ६ बालकांचे) | | |
|---|---|---|---|
| | महाराष्ट्र (जनगणना) | कोल्हापूर | पन्हाळा |
| २००१ | ९१३ | ८३९ | ७९५ |
| २०११ | ८८३ | ८४५ * | - |
| डिसेंबर २०११ अखेर एच.एम.आय.एस. | - | ८८१ | ८६० |

* राज्यामध्ये केवळ ४ जिल्हयामध्ये २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये वाढ झालेली आहे त्यामध्ये कोल्हापूर जिल्हयाचा समावेश आहे.

## स्कोअर बोर्ड





## ११) शासकीय / निमशासकीय कार्यालयात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाचा प्रतिबंध

**प्रस्तावना** :-

कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक सतावणूकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र. ६६६-७० मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वे भारत सरकारकडून प्रस्तुत करण्यात आली आहेत. त्यातील मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यशासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांमध्ये सुधारणा केलेल्या आहेत.

लैंगिक छळवादामध्ये अशोभनीय अशा हेतूपुर्वक लैंगिक वर्तनाचा, प्रत्यक्ष वा अन्यथा याचा समावेश होतो, जसे की :-

अ) शारिरीक संपर्क आणि कामोद्दीपिक प्रणयचेष्टा,

ब) लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती,

क) लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे,

ड) कोणत्याही स्वरुपातील संभोगवर्णन / संभोगदर्शन / अश्लील साहित्याचे प्रदर्शन,

इ) कोणतेही अन्य अशोभनीय शारिरीक, तोंडी अथवा सांकेतिक आचरण.

मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वास अनुसरुन विशाखा जजमेंट नुसार जिल्हा परिषद, कोल्हापूर मध्ये जिल्हयाच्या ठिकाणी लैंगिक छळ तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली असून सर्व तालुक्याच्या ठिकाणीही अशा समितींची स्थापना करण्याबाबतचे निदेश संबधित गट विकास अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

अधिक माहिती करीता लैंगिक छळ तक्रार निवारण समितीच्या संदर्भातील सर्व समावेशक आदेशा बाबत महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मकचौ/२००६/प्र.क्र.१५/मकक, दि. १९ सप्टेंबर २००६ व कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळवणूकीच्या अनुशंगाने प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करतांना अवलंबावयाची कार्यपध्द्ती बाबत महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकचौ/२००९/प्र.क्र.१९/मकक, दि. ४ ऑक्टोबर २०१० च्या प्रती सोबत देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हास्तरावरील तक्रारी बाबत संबधित कार्यालय प्रमुखांकडे अथवा खालील ठिकाणी तक्रार सादर करता येईल किंवा सल्ला व मार्गदर्शन घेता येईल :-

**डॉ. हर्षला वेदक, (मो.क्र.9423039869) आरोग्य विभाग, जि.प.कोल्हापूर, अध्यक्षा, महिला कर्मचारी लैंगिंक छळवणूक तक्रार निवारण जिल्हास्तरीय समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर *किंवा* महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर (फो.क्र. 0231-2668115).**

तालुकास्तरावरील तक्रारी बाबत गटविकास अधिकारी अथवा संबधित कार्यालय प्रमुखांकडे अथवा **तालुका स्तरावरील महिला तक्रार निवारण समिती कडे** तक्रार सादर करता येईल किंवा सल्ला व मार्गदर्शन घेता येईल.

**सदर माहितीचा शासन निर्णय सोबत जोडलेला आहे.**

## १२) स्तनपान व शिशुपोषण कार्यक्रम अंतर्गत हिरकणी कक्षाची स्थापना

मातेने बाळाला स्तनपान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष असावा कि जेणेकरुन नि:संकोचपणे स्तनपान देता येईल याकरीता सन २००८-२००९ पासुन कोल्हापूर जिल्हयामध्ये स्तनपान शिशुपोषण चळवळीच्या माध्यमातून सर्व प्रा.आ.केंद्रामध्ये हिरकणी कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.





## १३) एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या सेवा खालीलप्रमाणे

१. **पुरक पोषण आहार :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत स्तनदा व गरोदर माता घरपोच आहाराचा (टी.एच.आर) पुरवठा केला जातो .

२. **लसीकरण :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांचे लसीकरण केले जाते .

३. **आरोग्य तपासणी :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची आरोग्य तपासणी दर महिन्याला केली जाते.

४. **संदर्भ आरोग्य सेवा :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना संदर्भ सेवा दिली जाते.

५. **अनौपचारीक शिक्षण :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अनौपचारीक शिक्षण दिले जाते.

६. **आरोग्य आणि सकसआहार प्रशिक्षण :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत १५ ते ४५ वयोगटातील मुली व महिला यांना प्रशिक्षण दिले जाते.